# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati@dtemaharashtra.gov.in Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


क्रमांक :- विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१८/1994

दिनांक :- 21 MAY 2018

**प्रति,**

**प्राचार्य,**

सर्व शासकीय/अनुदानित व विनाअनुदानित,
पदवीका/पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- राजश्री छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना या योजनांच्या सन २०१७-१८ करीता तपासणीसाठी प्रलंबित अर्जासाठी उपाय योजना.**

**संदर्भ :-** मा.संचालक, तंशिस., म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १८/तंशिस/वि.का.पत्र/२०१८/१८८ दिनांक

**महोदय,**

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता राजश्री छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेसाठी आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांनी अर्ज भरलेले आहे. सदर विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज संस्थास्तरावर किंवा विभागीय स्तरावर तपासणी साठी प्रलंबित राहीलेले असल्यास सदर अर्ज व त्यामध्ये असलेल्या त्रृटी **दिनांक २५/५/२०१८** पर्यंत या कार्यालयांत आपल्या प्रतिनिधीने प्रत्यक्ष हजर राहुन अर्ज मंजुरीबाबतची कार्यवाही करावी. या दिनांकानंतर अर्ज या कार्यालयास सादर केल्यास कोणत्याही परिस्थितीत अर्ज मंजुर करण्याची कार्यवाही करण्यात येणार नाही त्यामुळे विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान झाल्यास होणा-या नुकसानीस संस्था प्रमुख जबाबदार राहील, याची संस्था प्रमुखांनी नोंद घ्यावी.तसेच संकेतस्थळावर नविन अर्ज भरण्यात येणार नाही, याची सुध्दा नोंद घ्यावी.

सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.